पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय निगडी, पुणे-44
जा.क्र.अक्षेका/11/कावि/1249/2017
दिनांक 29/9/2017

प्रति,

मा.श्री./श्रीम. ------------------------------
सदस्य/सदस्या अ प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी- 44

विषय:- अ प्रभाग समितीची विशेष सभा दि. 3/10/2017 रोजी सकाळी 11.00 वा. आयोजित केलेबाबत..

मा. महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीचे मा. सभापती श्री केशव हनुमंत घोळवे व इतर सन्मा. सदस्य यांनी दि. 29/9/2017 रोजीचे पत्रान्वये प्रभाग समितीच्या विशेष सभेचे दि.3/10/2017 रोजी आयोजन करणेची मागणी केलेनुसार अ प्रभाग समितीची विशेष सभा मंगळवार दिनांक 3/10/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. प्रस्तुत सभेस कृपया आपण उपस्थित रहावे, हि विनंती.

आपली विश्वासू,

(सही) 29/9/17

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

कृ.मा.प.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

## अ प्रभाग समिती

### कार्यपत्रिका क्रमांक 4

दिनांक :- 3/10/2017

वेळ: सकाळी 11.00 वाजता

..........................................................................................................................

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची विशेष सभा मंगळवार दि. 3/10/2017 रोजी सकाळी 11.00 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृह येथे आयोजित केली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक 1 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 29/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 10 शाहूनगर येथे रस्त्यांप्रमाणे सोसायटयांचे नामफलक लावणे |
| विषय क्रमांक 2 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 29/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>प्रभाग क्रमांक 10 शाहूनगर येथील कुत्रे व डुक्करे तसेच मोकाट जनावरे यांचे बंदोबस्ताकरीता अ क्षेत्रीय कार्यालयामध्ये स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वीत/मंजुर करणे. |
| विषय क्रमांक 3 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 29/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील प्रभाग क्रमांक 10, 14, 15 व 19 मधील सर्व अधिकारी त्यांचे कामाचे स्वरुप तसेच संपर्क नंबर्स, नगरसेवक यांचे नाव, संपर्क नंबरची पत्रके तयार करुन छापून प्रत्येक सोसायटी , बंगलेधारकांस देणे व सदर ठिकाणी डकविणे |
| विषय क्रमांक 4 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 29/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>अ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील सर्व क्रिडा विभागाची कामे अ प्रभाग मधूनच करणेसाठी आवश्यक मनुष्यबळ अ प्रभाग येथे कार्यान्वीत करणे. |
| विषय क्रमांक 5 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 29/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>अ प्रभाग हद्दीमधील प्राधिकरण व एमआयडीसी चे रिकामे प्लॉटस संबंधित संस्थांनी स्वच्छ ठेवावेत व वॉल कंपाऊड करावेत किंवा सदर भूखंडासंबंधीच्या नियम व अटीशर्तींचे पालन करावे. |
| विषय क्रमांक 6 | मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचा दि. 29/9/2017 रोजीचा प्रस्ताव<br>अ प्रभाग हद्दीमधील लघु, मध्यम व मोठे उदयोजक यांना बोलावून CSR ची गरजेनिहाय कार्ये निश्चित करुन कार्यान्वीत करणे. |

| | |
|---|---|
| विषय क्रमांक ८ 7 | मा. उपसंचालक, नगररचना व विकास विभाग यांचेकडील पत्र क्रमांक नरवि/कावि/15/ पिंपरी/254/2017 दि. 15/9/2017<br>फ प्रभाग समिती ठराव क्रमांक 8 दि. 8/7/2016 अन्वये प्रभाग क्रमांक 28 मासुळकर कॉलनी येथील भाग अत्याधुनिक सोयीने विकसित होत असून नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने व मुख्य रस्त्यावर होणा-या गाडयांच्या वाहतुकीस पर्यायी उपलब्धता होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रभाग क्रमांक 28 टेल्को सिमाभिंती लगतचा रस्ता [ W सेक्टर ] ते मोरवाडी आयटीआय रस्ता [ स.नं. 139/140 येथील अमृतेश्वर ट्रस्टची जागा ] महानगरपालिका अधिनियम 2005 मधील कलम 205 नुसार नागरिकांच्या सोयीसाठी पर्यायी रस्ता म्हणून घोषित करणेकामी ठराव मंजुर करणेत आला होता. त्यानुसार मा. आयुक्त सो. यांचेकडील दि. 3/12/2016 रोजीच्या प्रस्तावान्वये विषयांकित प्रकरणी कार्यकारी अभियंता स्थापत्य , फ क्षेत्रीय कार्यालय व अमृतेश्वर ट्रस्ट यांचे सहमतीने केलेला पर्यायी रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 205 नुसार घोषीत करणे प्रकरणी नागरीकांच्या हरकती/सुचना मागविण्यासाठी दि. 17 डिसेंबर 2016 रोजीच्या दै. आज का आनंद, दै प्रभात व दै. पुण्यनगरी या वृत्तपत्रांमध्ये जाहीर प्रकटन देण्यात आले होते.<br>सदरच्या वृत्पत्रामधील जाहीरातीस अनुसरुन् एक हरकत/सुचना उपसंचालक, नगररचना, पिंपरी यांचेकडे प्राप्त झालेली होती. त्यास अनुसरुन संबंधित हरकतदारास दि. 1/6/2017 व दि. 22/6/2017 रोजी सुनावणीस बोलावूनही हरकतदार सुनावणीस अनुपस्थित राहिल्याने हरकतदाराची हरकत नरवि/कावि/15/ 208/2017 दि. 17/7/2017 रोजीच्या सभावृत्तातांन्वये फेटाळण्यात आलेली आहे.<br>तरी पिंपरी वाघेरे सर्व्हे नंबर 139 व 140 मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 205 नुसार नागरिकांच्या सोयीसाठी रस्ता घोषित करणेकामी मान्यता देणेबाबत विचार करणे. |

29/9/17

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी- 44
क्रमांक अक्षेका/11 /कावि /1249 /2017
दि. 29 / 9/2017